# <u>यज्ञरक्षण</u>

राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न मोठे होत होते. निरनिराळ्या कला आणि विद्या शिकत होते. वेद आणि शास्त्रे शिकत होते. धनुर्विद्या आणि युद्ध-कला शिकत होते. ते शक्तिमान आणि शूर बनले. पण ते तितकेच प्रेमळ, लाघवी आणि सर्वांना प्रिय झाले होते. राजकुमारांना पाहून दशरथ राजा आणि त्याची प्रजा आनंदी झाले.

असे दिवस जात होते. एके दिवशी महर्षी विश्वामित्र दशरथाच्या सभेत आले. दशरथाने त्यांचे स्वागत केले. आदराने बसायला आसन दिले आणि नमस्कार करून विचारले, "महर्षी, मी आपल्यासाठी काय करू शकतो? आपली काय इच्छा असेल ते सांगा. मी ती नक्की पूर्ण करीन."

विश्वामित्र म्हणाले, "राजा, माझ्या आश्रमात मी यज्ञ करायला सुरुवात केली. पण अरण्यातले राक्षस माझा यज्ञ पूर्ण होऊन देत नाहीत. यज्ञात विघ्न आणतात. यज्ञ मोडतात. यज्ञाची दीक्षा घेतल्यामुळे त्या राक्षसांना मी शिक्षा करू शकत नाही. माझा यज्ञ पूर्ण करण्यासाठी मला तुझी मदत हवी आहे. यज्ञाच्या रक्षणासाठी तू तुझा ज्येष्ठ पुत्र श्रीराम माझ्याबरोबर पाठव."

दशरथाला भीती वाटली. राम अजून लहान होता. इतका लहान राम एकटा सर्व राक्षसांशी कसा युद्ध करणार? त्याला काही झाले तर काय? तो कळवळून विश्वामित्रांना म्हणाला, "महर्षी, मला क्षमा करा. माझ्या श्रीरामाला माझ्यापासून दूर नेऊ नका. तुमच्या यज्ञरक्षणासाठी मी माझे सगळे सैन्य देतो."

विश्वामित्र म्हणाले, "मला तुझे सैन्य नको. या कामासाठी एकटा श्रीरामच समर्थ आहे. तू मला माझी इच्छा पूर्ण करण्याचे <u>वचन दिले</u> आहेस. तू तुझे वचन पाळणार नसशील तर हा मी चाललो."

तेव्हा दशरथाने आपल्या <u>भावना आवरल्या</u>. तो म्हणाला, "महर्षी, मला क्षमा करा. आपण स्वतः बरोबर असताना श्रीरामाला कसलाच धोका नाही. आपण त्याला घेऊन जा."

श्रीराम आनंदाने विश्वमित्रांबरोबर जाण्यास तयार झाला. श्रीरामाबरोबर लक्ष्मणही जाण्यास सिद्ध झाला. तो <u>जणू काही</u> रामाची सावलीच होता. हाती धनुष्य आणि पाठीवर भाता घेऊन अयोध्येचे राजकुमार यज्ञरक्षणासाठी निघाले.

शरयू नदीच्या तीराने विश्वामित्र, श्रीराम आणि लक्ष्मण चालले होते. विश्वामित्रांनी त्यांना अनेक प्राचीन कथा सांगितल्या. विद्या शिकविल्या. ज्ञानदान केले.

Unrestricted

जाता जाता ते एका घनदाट अरण्यात येऊन पोहोचले. तेथे ताटिका नावाची भयंकर राक्षसी राहत होती. तिच्या भीतीने तो प्रदेश निर्मनुष्य झाला होता. विश्वामित्र ताटिकेची कथा सांगत असतानाच ती भयंकर राक्षसी तेथे येऊन पोहोचली. मोठ्यांदा डरकाळ्या फोडत ताटिका त्यांच्या अंगावर धावून गेली. विश्वामित्रांनी श्रीरामाला ताटिकेचा वध करण्याची आज्ञा केली. ते म्हणाले, "ताटिका जरी स्त्री असली तरी ती सर्वांना त्रास देत आहे. तिला मारणे हाच धर्म आहे." विश्वामित्रांच्या या बोलण्यामुळे श्रीरामाचा संशय फिटला. त्याने आपल्या बाणांनी ताटिकेचा वध केला.



प्रवास पूर्ण करून ते विश्वामित्रांच्या आश्रमात पोहोचले. यज्ञ सुरु झाला. यज्ञात विघ्न आणण्यासाठी मारिच आणि सुबाहू चालून आले. राम आणि लक्ष्मण यांनी त्या दोघांचा त्यांच्या सर्व राक्षस सैन्यासह नाश केला. यज्ञाचे रक्षण झाले. राक्षसांच्या त्रासापासून अरण्यातील लोकांची सुटका झाली. श्रीराम आणि लक्ष्मण यांचे शौर्य पाहून सर्वांना अतिशय समाधान झाले.

वाक्यात उपयोग करा:

वचन दिले, भावना आवरल्या, जणू काही, संशय फिटला